## तक्ता सुची



| प्रकरण | तक्ता क्रमांक | तक्ता शिर्षक | पान |
|---|---|---|---|
| प्रकरण १ले | १•१ | भारतातील दूध व्यवसायाचा विकास | (१०) |
| प्रकरण २ रे | २•१ | निपाणीतील कांही प्रमुख उद्योगधंदे | (२० ते २२) |
| | २•२ | निपाणीतील प्रमुख व्यापार | (२५) |
| प्रकरण ३ रे | ३•१ | संघाचे सभासद | (४२) |
| प्रकरण ४ थे | ४•१ | संघाचे भागभांडवल | (५०) |
| | ४•२ | संघाच्या ठेवी | (५३) |
| | ४•३ | संघाची कर्जे | (५६) |
| | ४•४ | संघाचा राखीव निधी | (६०) |
| | ४•५ | संघाची मालमत्ता | (६४) |
| | ४•६ | संघाची गुंतवणूक | (६८) |
| | ४•७ | संघाचे उत्पन्न व खर्च | (७२) |
| | ४•८ | संघाचा नफा | (७५) |
| प्रकरण ५ वे | ५•१ | म्हैशीचे दूध संकलन व वितरण | (८३) |
| | ५•२ | गाईचे दूध संकलन व वितरण | (८५) |
| | ५•३ | बेकरी उत्पादन | (९०) |
| प्रकरण ६ वे | ६• १ | पशुखाद्याची विक्री | (९४) |

## प्रकरण १ ले

## समस्येची मांडणी व संशोधन पध्दती

१•१) प्रस्तावना :-

भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतमालाची खरेदी-विक्री व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे• प्रा•बी•एन• चौबे यानी म्हटल्याप्रमाणे भारतातील हरीत क्रांतीचे मोजमाप शेतमालाचे दर एकरी उत्पादन किती वाढले यावरुन ठरविण्यापेक्षा, शेतकऱ्याच्या उत्पन्नात किती वाढ झाली यावरुन ठरविणे योग्य आहे• कारण शेतकऱ्यांचे उत्पन्न, उत्पादनाप्रमाणेच शेतमालाच्या किंमतीवर अवलंबुन असते• दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास शेतमालाची विक्री व्यवस्था कार्यक्षम असल्याशिवाय, शेतकऱ्यांची प्रगती होणार नाही• आर्थिकदृष्टया कमकुवत व अशिक्षीत शेतकरी बाजारात स्पर्धा करु शकत नाहीत• तेंव्हा शेतमालाच्या खरेदी विक्री साठी सहकारी चळवळीचा आधार घेतल्यास, शेतकऱ्यांचा नक्की फायदा होतो• या कल्पनेतुनच सहकारी खरेदी विक्री संस्थांची आणि डेअरी सहकारी संस्थांची स्थापना झाली•

सहकारी विक्रीचा अर्थ व्यापक आहे• केवळ मालाची विक्री नव्हेतर त्याला आनुषंगिक असलेल्या सेवा आणि व्यवहारही या संस्थांनी करावेत अशी साधार अपेक्षा आहे•

कारण त्याशिवाय विक्री व्यवस्थीतपणे/करता येणार नाही अर्थात केवळ दलाली स्वरुपाचेच व्यवहार नव्हेत तर, प्रक्रिया, ग्रेडिंग ,एकत्रीकरण, दळणवळण, वहातुक , साठवणूक विशीष्ठ परिस्थीतीत खरेदी , शेतीला उपयुक्त साधने पुरविणे, (खते, बियाणे, जंतुनाशक द्रव्ये, अवजारे इ.) मार्केटबाबत माहिती, शक्य तर कृषी व्यवहार सेवाही या संस्थानी पुरवाव्यात अशी आधुनिक सहकारी विक्रीशास्त्राची अपेक्षा आहे.

आपल्या देशांत शेतमालाची शेतकऱ्याला मिळणारी किंमत फारच कमी तर त्यासाठी ग्राहकाना द्यावी लागणारी किंमत फारच जास्त असते. या दोन किंमतीतील फरक, अवाढव्य नफ्यांच्या स्वरुपात, दलाल व व्यापारी लुबाडत असतात, त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादकता व उत्पादन वाढविण्यास उत्तेजन नसते. यातुन मार्ग काढण्यासाठी सर्व शेतकरी संघटित होऊन सहकारी तत्वाने शेतमालाच्या खरेदी विक्रीचे कार्य करण्याचा निर्णय घेतात.

खरेदी विक्री यास विपणन असे देखील म्हणतात. शेतमालाची खरेदी विक्री किंवा विपणन ही एक व्यापक अर्थाची संकल्पना आहे. यात उत्पादक ते उपभोक्ता या दरम्यान वस्तुंच्या प्रवासाच्या सर्व टप्प्यांचा समावेश केला जातो. जसे संकलन, त्याची वर्गवारी व प्रतवारी ठरविणे, वहातूक करणे,त्यांच्या साठा करणे व बाजारामध्ये विक्री करणे इ.

यावरुन आपल्याला असे म्हणता येईल की, सहकारी खरेदी विक्री संस्था म्हणजे शेतमालाची विपणन व्यवस्था, करणारी व

सहकारी तत्वानुसार चालणारी संस्था होय.

सहकारी खरेदी विक्री संस्था विकसीत तसेच अविकसीत देशात यशस्वी झाल्या आहेत. अमेरिका, ब्रिटन, डेन्मार्क कॅनडा इत्यादी विकसीत देशात सहकारी खरेदी विक्री संस्थानी फार चांगले कार्य केले आहे. म्हणून त्या महत्वाचा ठरतात त्यांची वैशिष्ठे पुढील प्रमाणे सांगता येतील

१) सर्व शेतकरी एकत्रीत आल्यामुळे, अनावश्यक स्पर्धा कमी होते. तसेच शेतक-यांची सौदाशक्ती, वाढते परिणामी शेतक-यांना त्यांच्या शेतमालास जास्तीत जास्त किंमत मिळते.

२) शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी विविध प्रकारचा खर्च करावा लागतो. संकलन, साठा, वहातुक, प्रतवारी वर्गवारी इ. यासाठी प्रत्येक शेतक-याने खर्च करावयाचे ठरविल्यास खर्चिक होते. परंतु सहकारी खरेदी विक्री संस्था ही कार्य करीत असल्यामुळे बचत होते. परिणामी खर्च कमी होतो.

३) खाजगी व्यापा-यांची मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्थांची स्थापना केली जाते. जर ही यंत्रणा नसेल तर शेतक-यांना आपला शेतमाल भांडवलदार सावकार मोठे व्यापारी यांना विकावा लागतो या धनाढय लोकांकडून सामान्य लोकांची पिळवणूक होते. तेंव्हा सहकारी खरेदी विक्री संस्थामुळे मक्तेदारीला आळा बसतो.

४) भारता सारख्या देशात मध्यस्थ हे शेतक-यांची पिळवणूक करीत असतात. सामान्य शेतक-यांची अनेक पध्दतीने फसवणूक होते. जसे खोटी वजने, व मापे वापरणे प्रतवारीचा अभाव, वेगवेगळया दलाली काढून

घेणे. धर्मदाय देणगी, गोरक्षण निधी शिक्षण निधी इ.

५) खरेदी विक्री संस्था या ग्राहकांच्या हितांचे रक्षण करत असतात. कारण नफा वाढवियासाठी खाजगी व्यापारी बेकायदेशिर व्यवहार करण्याची शक्यता असते. वस्तुंची साठेबाजी करणे कृत्रीम टंचाई निर्माण करणे भेसळ करणे इ. त्यामुळे ग्राहकाना अनावश्यक व जास्त किंमत द्यावी लागते. म्हणून सहकारी खरेदी विक्री संस्था स्थापन झाल्यामुळे व्यापा-यांचे गैरव्यवहार कमी होतात. व ग्राहकांना योग्य दर्जाच्या वस्तु रास्त किंमतीला उपलब्ध होतात.

भारतातील दुग्ध सहकारी संस्था/संघ हे प्रामुख्याने शेतक-यांच्या (दुध उत्पादकांच्या) दुधाची खरेदी विक्री करणा-या संस्था आहेत दुध उत्पादक शेतक-यांच्या सहकार्याने स्थापन झालेल्या दुध सहकारी संस्था जिल्हा अथवा तालुका संघाचे सभासद असतात. आणि हे संघ दुध संकलन व दुध वितरणाची जबाबदारी पार पाडीत असतात संबंध सहकारी दुध धंदयामध्ये संघाची भुमिका व कार्य अत्यंत महत्वाचे आहे. निवडलेल्या संघाचा तपशीलवार अभ्यास करण्यापुर्वी भारतातील सहकारी दुध संस्थाची थोडक्यात माहिती घेऊ.

१.२ ) भारतातील सहकारी दुध व्यवसायाचे महत्व :-

दुध हे पुर्णान्न समजले जाते. कारण दुधामध्ये मानवी जीवनाला आवश्यक असणा-या सर्व बाबी म्हणजे प्रथिने स्निग्ध पदार्थ, पिष्टमय पदार्थ व क्षार इ. जिवनसत्वे असतात. सर्व वयोगटातील लोकाना

दुधाचा वापर करता येतो. मानवी जीवनात दुधाला महत्व असल्यामुळे दुध व्यवसायाला महत्व येणे स्वभाविक आहे. तसेच दुध व्यवसाय शेतीला पुरक व्यवसाय असल्याने शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत या व्यवसायाला विशेष महत्व आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या आहारात तज्ञ शिफारशी प्रमाणे दरडोई दर दिवशी किमान २000 ग्रॅम दुध भारतीय लोकांना उपलब्ध व्हावयास पाहिजे परंतु १९८५-८६ च्या आकडेवारी नुसार भारतात दरडोई दर दिवशी ११0 ग्रॅमची उपलब्धता आहे. म्हणजेच भारतीयाना पुरेसे दूध मिळण्यासाठी दुध उत्पादन वाढले पाहिजे त्यासाठी दुध व्यवसायाचा विकास झाला पाहिजे.

ग्रामीण भागात जमीनीच्या मालकी हक्काच्या केंद्रीकरणामुळे श्रीमंत शेतकरी मध्यम शेतकरी व भुमीहीन असे वर्ग निर्माण होऊन आर्थिक विषमता वाढत आहे. दुध व्यवसायामुळे मध्यम आणि भुमी-हीन गरीब शेतक-याना वैयक्तीक उत्पन्न वाढविता येते. परिणामता: आर्थीक विषमता कमी होते.

दुध व्यवसायामुळे शेतक-याचे उत्पन्न वाढल्यास शेतकरी आपल्या वाढत्या उत्पनांच्या कांही भाग, शेतीच्या विकासासाठी खर्च करु शकतो त्यामुळे शेतीचा विकास होऊन देशाचा आर्थीक विकास होऊ शकतो.

१.३) भारतातील सहकारी दुध व्यवसाय:-

भारतातील सहकारी चळवळीला फार वर्षापासुनचा इतिहास आहे. सध्या सहकारी चळवळ ही सर्व अंगानी कारणीभुत झालेली आहे. शेतीच्या क्षेत्रामध्ये शेतीवर आधारीत उद्योग म्हणुन दुध व्यवसायाकडे पाहिले जाते. विशेषत: मागासवर्गीय क्षेत्रामध्ये ते एक उत्पन्नाचे साधन ठरलेले आहे.

साधारणपणे ७० ./. लोक हे ग्रामीण भागामध्ये रहात असुन त्यांचे उदर निर्वाहाचे साधन शेती हेच आहे आणि शेतीवर लोकांचा आतिरिक्त बोजा पडल्यामुळे संपुर्ण वर्षभर लोकाना पुरेसा रोजगार मिळत नाही. वर्षातील ३ ते ६ महिने हा काल शेतीच्या बाबतीत मंदीचा असतो.

दुध व्यवसाय म्हणजे उत्पादनाचा व्यवसाय प्रक्रिया -करणे, बाटल्या भरणे, दुधाचे वितरण आणि दुधापासुन उपपदार्थांची विक्री, उदा. लोणी, तुप इ. ही जरी दुध व्यवसायाची संकल्पना असली तरी भारतामध्ये विशेषता ग्रामीण भागामध्ये दुध व्यवसाय हा दुधाचे उत्पादन एकत्रीकरण, आणि शितकरण, केंद्रापर्यंत वहातुक आणि सरकारी प्रक्रीया केंद्राकडे पाठविणे या पुरतीत सिमीत झालेला आहे.

भारतामध्ये जगाच्या १/५ भाग हा दुध पशुपालनाचा मानला जातो( गाय, म्हैस, शेळी ) परंतु जागतीक उत्पादनात भारताचा १/६ इतकाच हिस्सा आहे.

सन १९७७ च्या गणनेनुसार भारतामध्ये १८५.५ दश-लक्ष जनावारे आणि ६१.३ दशलक्ष म्हैशी होत्या त्यापैकी २६.४ दशलक्ष

जनावरे व १४.४ दशलक्ष म्हैशी पासुनच दुधाचे उत्पादन होत होते. जगाच्या दुध उत्पादनात भारताचा ४ था क्रमांक लागतो. १९८५-८६ मध्ये दुधाचे उत्पादन ४१ दशलक्षटन इतके झाले होते. साधारणपणे ६०./. दुध बाजारात विकले जाई; ४०./. दुधाचा उपभोग घरी घेतला जाई.

सन १९८४-८५ मध्ये दरडोई दूध वापराचे प्रमाण हे १४९ मिली लिटर इतके होते राष्ट्रीय सल्लागार समीतीच्या मते साधारणपणे २८० मिली लिटर दुध हे दरडोई वापरायला हवे, यावरून स्पष्टपणे दिसते की भारतामध्ये दूध उपलब्ध होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे.

दुध उत्पादनांत वाढ होण्यासाठी उत्पादन वाढीची प्रेरणा निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी दुध उत्पादकाला दुधाला किफायतशीर भाव मिळणे आवश्यक आहे. दुध उत्पादकानी खाजगी मध्यस्थांना दुध घातल्यास उत्पादक व उपभोक्ते दोघांचेही शोषण होते. यावर उपाय म्हणजे सहकारी तत्वावर आधारलेला दूध व्यवसाय सुरू करणे त्यानुसार पंचवार्षिक योजनेच्या काळात भारतात सहकारी दुध व्यवसायाच्या विकासाचा चालना देण्यात आली.

पहिल्यायोजनेत शेतीला आधिक महत्त्व देण्यात आले होते. सहकारी दुध व्यवसायासाठी स्वतंत्र खर्चाची तरतुद नव्हती . या योजनेच्या सुरवातीला ९५८ प्राथमिक दुध सहकारी संस्था होता. जिल्हा पातळीवर ४६ दुध संघ होते योजनेच्या अखेरीस प्राथमिक दुध संस्थाची संख्या १४३४ इतकी झाली. तर जिल्हा संघाची संख्या ५६ इतकी झाली.

दुस-या योजनेत सहकारी दूध व्यवसायाच्या विकासासाठी १९ कोटी रु.ची तरतुद करण्यात आली होती. प्रत्येक्षात १0 कोटी रु.खर्च केले गेले या योजनेच्या सुरवातीला प्राथमिक दुध संघाची संख्या १५00 होती. योजनेच्या शेवटी प्राथमिक सहकारी दुध संस्थांची संख्या ३२00 पर्यंत वाढली. व जिल्हा दुधसंघाची संख्या ९४ पर्यंत वाढली.

तिस-या योजनेच्या सुरवातीला प्राथमिक दूध संस्थांची संख्या ३३४0 इतकी होती. तर जिल्हा दुध संघाची संख्या ९८ पर्यंत वाढली या योजनेच्या अखेरीस. म्हणजेच १९६५-६६ मध्ये प्राथमिक सहकारी दूध संस्थाच्या संख्येत ८0६२ पर्यंत वाढ झाली व जिल्हा सहकारी दुध संघाची संख्या १३५ पर्यंत वाढली.

तिस-यापंचवार्षिक योजनेनंतर १९६६ते ६९ याकाळात तीन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. या काळात भारतातील प्राथमिक सहकारी दुध संस्थांची संख्या ८३२0 इतकी झाली. तर जिल्हा संघांची संख्या १३७ एवढी झाली.

चौथ्या योजनेच्या सुरवातीच्या वर्षात म्हणजेच १९६९-७0 मध्ये प्राथमिक सहकारी दुध संस्थाची संख्या ८४00 इतकी झाली. तर जिल्हा सहकारी दुध संघाची संख्या १४0 इतकी होती. योजनेच्या शेवटच्या वर्षी प्राथमिक दुध संस्थांची संख्या १६७00 इतकी झाली व जिल्हा सहकारी दुध संघाची संख्या १४८ इतकी झाली.

पांचव्या पंचवार्षिक योजना काळात १९७७ मध्ये एक निबंधकांची परिषद भरविण्यात आली. या परिषदेत सहकारा मार्फत

दुध विकास प्रकल्पांच्या विकास करावा म्हणून प्राथमिक दुध संस्थाची स्थापना करावी यासाठी प्रयत्न केले गेले. तसेच प्रत्येक राज्यांत एक राज्य पातळीवर संघ स्थापन करावा असे ठरविण्यात आले. या योजनेच्या अखेरीस प्राथमिक सहकारी दुध संस्थांची संख्या २५८३० तर जिल्हा सहकारी दुध संघांची संख्या १७६ होती.

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीस म्हणजेच १९७९-८० मध्ये प्राथमिक सहकारी दुध संस्थांची संख्या २७२४१ इतकी होती व जिल्हा सहकारी दुध संघाची संख्या २०९ होती तर या योजनेच्या अखेरीस १९८४-८५ मध्ये प्राथमिक सहकारी दुध संस्थाची संख्या ३७४०० इतकी होती. व जिल्हा सहकारी दुध संघाची संख्या २४० होती.

सातव्या योजना काळात १९८५-८६ या वर्षात भारतात प्राथमिक सहकारी दुध संस्थाची संख्या ३९६७८ इतकी होती. तर जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या संघाची संख्या २७० इतकी होती अशाप्रकारे नियोजन काळात भारतातील दुध व्यवसायातील प्रगती झालेली आहे.

पंचवार्षिक योजना काळात दुध व्यवसायाचा विकास कशा प्रकारे झाला आहे याचे स्पष्टीकरण पुढील तक्ता १. १ वरुन मिळते.

तक्ता क्र•१•१

## भारतातील दूध व्यवसायाचा विकास

| अ•न | तपशील• | १९६०•६१ | १९६५.६६ | १९७० | १९७५ | १९८५ | १९९० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्थाची संख्या | ३२०० | ८०६२ | ११९०९ | २०८४७ | ५०९१९ | ६३१०० |
| २ | सभासद (लाखात ) | २•३८ | ६•९७ | १०•२३ | १६६९ | ५८•२० | ७५ |
| ३ | भागभांडवल (रु•कोटीत) | ०•४९ | १•४२ | ३•१६ | ६•६८ | १७•९६ | उ• ना |
| ४ | दूध उत्पादनाच्या विक्रीची किंमत (रु•कोटीत) | ५•४४ | १७•५३ | ४९•३१ | १३६•५३ | ६७६•४६ | उ•ना |

आधार :- Dairying in India, XX Dairy industry conference Issue, I D A Calcutta, 1989.

महाराष्ट्र दुग्ध व्यवसाय अंतरंग १९९२

वरील तक्ता क्र. १.१ वरुन असे दिसते की सन १९६०-६१ च्या तुलनेने सन १९८४-८५मध्ये दुध संस्थाची संख्या ही १७ पटीने वाढलेली आहे. त्याचबरोबर २९ पटीने सभासद वाढलेले आहेत. १७ पटीने भाग भांडवल आणि त्याच बरोबर १३० पटीने दूध आणि दूधापासुन बनविण्यात येणा-या पदार्थांच्या विक्रीमध्ये वाढ झालेली आहे.

भारतामध्ये ग्रामीण भागामध्ये हा दूध व्यवसाय धंदा स्थापन झालेला आहे. व या दूध व्यवसायाचा विकास भारतामध्ये होत आहे.

१९९० मध्ये भारतातील सहकारी दुग्ध व्यवसायाचा विकास हा ब-यापैकी झालेला आहे. प्राथमिक सहकारी दुध संस्थांची संख्या ६३१00 इतकी आहे. व एकुण सभासद हे ७५ लाख इतके झालेले आहेत.

१.४) भारतातील सहकारी दूध व्यवसायाची रचना

भारतातील सहकारी दूध व्यवसायाची रचना पुढील चार प्रकारामध्ये पडते.

१) प्राथमिक दूध उत्पादक संस्था-

भारतातील सर्वात खालचा घटक व सर्वात महत्वाचा घटक हा प्राथमिक सह. दूध संस्था होय. या संस्थेचे कार्यक्षेत्र तालुका पातळी पुरते मर्यादीत असते. खेड्यातील दूध उत्पादक या संस्थांचे सभासद आसतात. या संस्थांची प्रामुख्याने दोन उद्दिष्ट्ये आसतात. एक सभासदाना दूध उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करणे व दोन दूध व

दुधाच्या पदार्थांना किफायतशीर किंमती मिळतील अशी बाजार सुविधा उपलब्ध करणे म्हणून खेडे पातळीवर कार्य करणारी ही संस्था फार महत्त्वाची आहे.

२) जिल्हा/तालुका सहकारी दूध उत्पादक संघ :-

सहकारी दुध रचनेतील मधला दुवा म्हणजे प्राथमिक दूध उत्पादक संस्थांच्या एकत्रीकरणातुन निर्माण झालेले संघ. हे संघ दूध पुरवठा करण्याचे कार्य करतात. प्राथमिक दूध उत्पादक संस्थांनी गोळा केलेले दूध संघाकडे जमा होते. संघामार्फत हे दूध ग्राहकापर्यंत पोचविले जाते. त्याच प्रमाणे दूधावर प्रक्रीया करणे सभासद दूध संस्थांच्या सभासदाना दूध संस्थेमार्फत आवश्यक पशुखाद्य, पुरविणे, जनावरासाठी पशुवैद्यकीय सोय उपलब्ध करुन देणे इ. कार्ये हा जिल्हा पातळीवरील दूध संघ करीत असतो.

३) राज्य सहकारी दूध उत्पादक संघ-

जिल्हा सहकारी दूध उत्पादकांच्या एकत्रीकरणातुन राज्य सहकारी दूध उत्पादक संघाची निर्मिती होते. उतर, प्रदेश, महाराष्ट्र, गुजराथ व पंजाब इ.राज्यामध्ये राज्य सहकारी दूध उत्पादक संघ कार्य करीत आहेत. जिल्हा सहकारी दूध उत्पादक संस्थाना मार्गदर्शन व सर्व प्रकारची मदत करणे. जिल्हा दूध उत्पादक संघाकडील जादा दूध मोठ्या शहरामध्ये विक्री करणे . तसेच जिल्हा दूध संघाकडुन दूध पदार्थ विक्रीसाठी घेणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहकारी दूध

व्यवसाय व बाजारपेठ यांच्यावर नियंत्रण ठेवणे. इ.कार्ये राज्य सहकारी दुध उत्पादक संघ करीत असतो.

४) नॅशनल फेडरेशन ऑफ डेअरी को-ऑपरेटिव्ह -

हा राष्ट्रीय पातळीवर कार्य करणारा संघ असुन हा संघ. राज्य सहकारी दुध उत्पादक संघाना, मदत व मार्गदर्शन करतो. सहकारी दुग्ध व्यवसायाचा विकास करणे, सहकारी दुग्ध व्यवसाय व बाजारपेठ यांच्यावर नियंत्रण ठेवणे ही या सर्वोच्च शिखर संस्थेची कार्ये आहेत.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधामध्ये कर्नाटकातील एका विशीष्ठ भागात केंद्रित झालेल्या दुध सहकारी संघाचा अभ्यास केला आहे. त्याच्या प्रत्यक्ष अभ्यासापुर्वी ज्या पध्दतीने संघाचा अभ्यास केला त्याच्या अभ्यासाची म्हणजेच संशोधन पध्दती प्रथमता विस्तृत करणे आवश्यक आहे.

१.५) अभ्यासाची रुपरेषा

निपाणी भाग सहकारी दुध उत्पादक संघ लि, निपाणी कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हातील चिक्कोडी तालुक्यातील एक महत्वाच्या शहरामध्ये हा संघ कार्य करतो. निपाणी हे शहर सीमा भागातील महत्वाचे शहर म्हणुन समजले जाते. या शहरामुळे कर्नाटकातील कांही भाग व महाराष्ट्रातील कांही भाग जोडला गेलेला आहे. तसेच हा संघ कर्नाटकाच्या हद्दीत असला तरी तो दोन्ही राज्यामध्ये काही भागामध्ये कार्य करीत आहे. म्हणुन प्रस्तुत अभ्यासासाठी हा संघ निवडण्यात आलेला आहे.

चिक्कोडी तालुका हा शेतीप्रधान तालुका आहे. अशा शेती प्रधान तालुक्यात सहकारी तत्वावर चालणारा दूध व्यवसाय तालुक्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरु शकतो.

तसेच या संघाच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्हातील कागल गडहिंग्लज व भुदरगड तालुक्यातील कांही गांवाचे दूध संकलन केल्यामुळे तेथील लोकांची आर्थिक परिस्थीती सुधारत आहे.

भारतात सहकारी क्षेत्राच्या, अभ्यासाचा भार प्रामुख्याने पत पुरवठ्यावर राहिलेला आहे. त्यामानाने ग्राहक सहकारी चळवळ व सहकारी दुध व्यवसायाचा अभ्यास कमी झालेला आहे. त्यामुळेही या अभ्यासाची निवड करण्यात आली. स्वत: अभ्यासक विद्यार्थी चिक्कोडी तालुक्यातील रहिवाशी असल्यामुळे माहिती मिळविण्याच्या दृष्टीनेही या संघाची निवड करण्यात आलेली आहे.

१.५) अभ्यासाची उद्दिष्टेय

निपाणी भाग सहकारी दुध उत्पादक संघ लि, निपाणी या दुध संघाच्या कार्याचा आढावा घेणे हा या अभ्यासाच्या मुख्य हेतु आहे. परंतु हा संघ, सीमा भागातील असल्यामुळे आवश्यक त्या ठिकाणी सहकाराच्या दृष्टीनेही संघाच्या कार्याचा विचार केला आहे. या अभ्यासाची विशीष्ठ उदिष्टये खालील प्रमाणे

१) निपाणी भाग सहकारी दुध उत्पादक संघ लि, निपाणी संघाच्या सभासद संख्येत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

२) संघाने दूध संकलन दूध वितरण व दूध उत्पादकाना उपयोगी पडण्यासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

३) संघाच्या अर्थ भांडवला संबंधीचा अभ्यास करणे.

४) संघाच्या स्थापनेमुळे संघाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्याच्या उत्पनावर, रोजगारावर , बचत गुंतवणूकीवर आणि उपभोगावर कोणतापरिणाम झाला यांचा अभ्यास करणे.

५) संघाच्या विविध शाखांच्या विकासाचा आभ्यास करणे.

१.७) <u>गृहितके</u> :--- उदिष्टांच्या आधीन राहुन निवडलेल्या दुध संघाच्या अध्ययनासाठी खालील गृहीतके तपासुन पाहिले जाणार आहेत.

१) ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण लोकांच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीने सहकारी क्षेत्राचा विकास महत्वाचा आहे.

२) दूध व्यवसाय हा शेतीस जोड व्यवसाय असुन या व्यवसायामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते व शेती विकासास मदत होते.

३) सहकारी दूध व्यवसायामुळे ग्रामीण भागात दूध व्यवसाय मोठया प्रमाणावर करण्यास उत्तेजन मिळते.

४) सहकारी दूध व्यवसायामुळे ग्रामीण भागातील दूध व्यवसायात वाढ होऊन ग्रामीण भागातील लोकाना एक स्वतंत्र व्यवसाय म्हणून देखील हा व्यवसाय करणे शक्य होते. त्यामुळे ग्रामीण भागात नविन रोजगार निर्मिती होते.

५) सहकारी दूध व्यवसायामुळे ग्रामीण भागातील मध्यम शेतकरी व भुमीहीन यांची आर्थिक परिस्थीती सुधारुन ग्रामीण भागातील विषमता कमी होते.

६) सहकारी दुध व्यवसायामुळे ग्रामीण भागाचा विकास होऊन आर्थिक विकासात प्रादेशिक समतोल प्रस्थापित होतो.

१.८) माहितीचे संकलन:-

संघांच्या स्थापनेपासुनची आभ्यासासाठी आवश्यक असणारी संख्यात्मक माहिती प्रामुख्याने संघांच्या वार्षिक अहवालावरून मिळविलेली आहे. म्हणजेच संघाच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी दुय्यम सामुग्रीचा वापर केलेला आहे. जिथे ही दुय्यम माहिती अपुरी पडली आहे तिथे प्रत्यक्ष माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१.९) आभ्यासाची योजना:-

निपाणी भाग सहकारी दुध उत्पादक संघ लि, निपाणी या संघाच्या कार्याचा आढावा घेत असताना सीमा भागातील एक विशीष्ट दुध उत्पादक संघ म्हणून जो अभ्यास केलेला आहे. त्याची माहिती पुढील पांच प्रकरणात मांडलेली आहे.

१) पहिल्या प्रकरणात सहकारी खरेदी विक्री संस्थांच्या कार्याचे स्वरूप व वैशिष्ठे यांचा अभ्यास मांडलेला आहे. तसेच भारतातील दुध व्यवसायाचा विकास कसा झाला आहे याची माहिती आहे.

२) प्रकरण तीनमध्ये निपाणी भाग दुध उत्पादक संघ लि निपाणी या दुध संस्थेच्या एकुण आर्थिक व्यवहारांचा अभ्यास करण्यात

आलेला आहे.

३) प्रकरण क्रमांक चार मध्ये निपाणी भाग दुध उत्पादक सहकारी संघ लि निपाणी यांच्या कार्याच्या आढावा घेण्यात आलेला आहे.

४) प्रकरण क्रमांक पांच मध्ये दूध संघाला एकुण दूध संकलन व दूध वितरण तसेच दुग्ध पदार्थ यांचे वितरण व वहातुक या पासुन मिळणा-या फायदांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.